# पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर

कळवा खाडी पुलाजवळ,
ठाणे (प.) –४०० ६०१
दुरध्वनी क्र.२५३४४४९९
ई–मेल: cp.thane@mahapolice.gov.in


**OW/DCP TRAFFIC THANE/CP – THANE/ MUMBRA BYPASS /REPAIR/2003/2018** **DATE – 18.04.2018**

**संदर्भ** :– मुंब्रा कौसा बाहयवळण रस्ता प्रामा – ४ कि.मी. १३३/८०० ते १३९/८१० रस्त्यावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत.

–––––००–––––

**"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"**

ज्याअर्थी, ठाणे शहरा अंतर्गत परिसरातून राज्यांतर्गत व बाहेरील राज्यातून मुंब्रा बायपास मार्गे जे. एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई कडून भिवंडी/नाशिक/गुजरातकडे राज्य महामार्ग क्र.३ अथवा घोडबंदर रोडने जड–अवजड वाहनांची मोठया प्रमाणत ये–जा होत असते.

२) ज्याअर्थी, मुंब्रा बायपास रेतीबंदर जवळील मुंब्रा कौसा बाहयवळण रस्ता प्र.रा.मा. –४ कि.मी. १३३/८०० ते १३९/८१० या लांबीतील ( मुंब्रा वाय जंक्शन ते पारसिक रेतीबंदर ) रेल्वे उड्डाण पुलाचे मजबुतीकरण करणे बेअरिंग बदलणे, व काही लांबीतील डेकस्लॅब तोडून नव्याने बांधण्याचे काम व इतर दुरूस्तीचे काम उप–कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल हे सुरू करणार असल्याने मुंब्रा बायपास रस्त्यावरील सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद करण्याबाबत कळविलेले आहे.

३) ज्याअर्थी जे.एन.पी.टी. बंदर, नवीमुंबई, दक्षिण भारतातून पुणे मार्गे येणाऱ्या व गुजरात, नाशिक, भिवंडी व उत्तर भारतात जाणाऱ्या व येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना मुंब्रा बायपास बाहयवळण रस्ता पूर्णपणे बंद करण्यात येत असल्याने या मार्गावरून येणारी व जाणारी वाहतूक बाधित होणार आहे.

४) ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाच्या, मुंबई शहरात मोटार वाहनाच्या वायु प्रदुषणाबाबत सी.एन.जी. /एल.पी.जी. वर चालणाऱ्या वाहना खेरीज ८ वर्ष वयावरील कोणतेही परिवहन वाहनास प्रवेश बंद केले आहेत. त्या संदर्भातील तद्अनुषंगीक वेळोवळी निर्गमित आदेश/सुचनाचे अधिन राहून त्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

५) त्याअर्थी मी, परम बीर सिंह, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. – ११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करतो की :–

५.१) जे.एन.पी.टी. – नवीमुंबई – दक्षिण भारतातून पुणे मार्गे – कळंबोली सर्कल नवीमुंबई – तळोजा मार्गे येवुन नाशिक, गुजरात, भिवंडी, उत्तर भारतात जाणाऱ्या जड–अवजड वाहनाना कल्याणफाटा व शिळफाटा मार्गे मुंब्रा बायपास रोडने जाण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–**

अ) जे.एन.पी.टी. नवीमुंबई कडून नाशिक दिशेने जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना जे.एन.पी.टी. –डी पॉईंट – पळस्पे फाटा – डावीकडे वळण घेऊन जुन्या मुंबई पुणे रोडने चौकगांव/चौकफाटा – डावीकडे वळण घेऊन कर्जत – मुरबाड – उजवीकडे वळण घेऊन सरळगांव – डावीकडे वळण घेऊन किन्हवली मार्गे शहापूर वरून राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरून नाशिक अथवा नाशिकच्या दिशेने इच्छीत स्थळी २४ तास (दिवसा व रात्रौ) पूर्णवेळ ये–जा करतील.

ब) जे.एन.पी.टी. नवीमुंबई येथून भिवंडीकडे जाणारे जड–अवजड वाहने रात्रौ २३.०० वा. ते पहाटे ०५.०० वा.पर्यंत जे.एन.पी.टी.– कळंबोली सर्कल – तळोजा – कल्याणफाटा याठिकाणी उजवीकडे वळण घेऊन कल्याण–शिळ रोडने – काटई – पत्रीपुल – कल्याण दुर्गाडी सर्कल ब्रिज – कोनगांव – रांजनोली नाक्यावरून राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरून फक्त भिवंडीच्या दिशेने जातील.

५.२) जे.एन.पी.टी.नवीमुंबई कडून उरणफाटा मार्गे महापे सर्कल कडुन शिळफाटा मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना उजवीकडे वळण घेऊन शिळफाटयाकडे येण्यास पूर्णपणे मनाई करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –**

सदर वाहनांना रात्रौ २३.०० वा. ते पहाटे ०५.०० वा. पर्यंत महापे सर्कल येथून डावीकडे वळण घेउन हॉटेल पोर्टीका सरोवर समोरून–उजवे वळण घेऊन – रबाळे एम.आय.डी.सी. मार्गे रबाले नाका – ऐरोली – पटणी सर्कल – डावीकडे वळूण घेऊन – ऐरोली सर्कल (रबाले ट्राफिक चौकी समोरून) उजवीकडे वळण घेऊन मुलूंड ऐरोली ब्रिज वरून ऐरोली टोलनाका मार्गे उजवीकडे वळण घेऊन – पूर्व दुतगती महामार्गे मुलूंड आनंदनगर टोलनाक्यावरून – घोडबंदर रोडने गुजरातच्या दिशेने जातील.

५.३) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ – अहमदाबाद गुजरात कडून जे.एन.पी.टी नवीमुंबईकडे व पुणे मार्गे दक्षिण भारतात जाणारी जड–अवजड वाहनांसाठी सुध्दा पुर्ण वेळ (२४ तास ) मुंब्रा बायपास वापरण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –**

अ) टेननाका वसई मार्गे – वाकोडा टोलप्लाझा – वाडागांव याठिकाणी उजवीकडे वळण घेऊन – कवाड टोलनाका – नदीनाका ब्रिजवरून डावीकडे वळण घेऊन चाविंद्रा – वडपा – मुंबई नाशिक हायवेवरून उजवीकडे वळण घेऊन पुढे येवईनाका याठिकाणी येउन डावीकडे वळण घेऊन – पाईप लाईन मार्गे – सावद चौक – उजवीकडे वळण घेऊन गांधारी ब्रिजवरून – आधारवाडी सर्कल – उजवीकडे वळण घेऊन दुर्गाडी – पत्री पुल – टाटा पॉवर हाउस – बदलापूर चौक (काटई चौक)– येथे डावीकडे वळण घेऊन खोणी सर्कल – उजवीकडे वळण घेऊन उसाटणे मार्गे तळोजा एम.आय.डी.सी – न्हावडा फाटा – डावीकडे वळण घेऊन कळंबोली सर्कल येथून पुढे रात्रौ २३.०० ते ०५.०० वा. पर्यंत इच्छितस्थळी जातील.

ब) चिंचोटी येथून जे.एन.पी.टी.नवीमुंबई येथे भिवंडी नारपोली मार्गे जाणाऱ्या वाहनांना पहाटे ०५.०० वा. ते रात्रौ २३.०० वा.पर्यंत प्रवेश बंद करण्यात येत आहे.

परंतू चिंचोटी वरून नारपोली भिवंडी गोडावून परिसरात येणारी जड अवजड वाहनांना मालोडी टोलनाका मार्गे अंजूरफाटा येथे पूर्णवेळ प्रवेश देण्यात येत आहे.

क) वर्सोवा कडून जे.एन.पी.टी. नवीमुंबई व दक्षिण भारतात जाणारे जड अवजड वाहनांना रात्रौ २३.०० वा. ते पहाटे ०५.०० वा. पर्यंत प्रवेश देण्यात येत असून सदर वाहने घोडबंदर रोडने –

कापूरबावडी – कोपरी ब्रिज – मुलूंड चेकनाका – ऐरोली टोलनाका मार्गे ऐरोली सर्कल – डावीकडे वळण घेऊन – पटणी जक्शन – उजवीकडे वळण घेऊन – रबाले नाका – महापे सर्कल – उरणफाटा येथून इच्छित स्थळी जातील.

५.४) तसेच फक्त घोडबंदर रोडने गुजरात कडून नवी मुंबई जे.एन.पी.टी. कडे येणाऱ्या व नवीमुंबई जे. एन.पी.टी. कडून घोडबंदर रोडने गुजरातकडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनाना वरील वेळे व्यतिरिक्त दुपारी १२.०० ते १६.०० वा. पर्यंत नियंत्रीत पध्दतीने आनंदनगर चेकनाका मार्गे जे.एन.पी.टी./गुजरातकडे ये–जा करतील.

५.५) भिवंडीकडून जे.एन.पी.टी. नवीमुंबई कडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना मुंब्रा बायपास मार्गे जाण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्गः–**

अ) भिवंडी मधून जे.एन.पी.टी. अथवा पुणे मार्गे दक्षिण भारतात जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना मानकोली जंक्शन – नाशिक मुंबई हायवे – रांजनोली नाका – शहापुर उजवीकडे वळुन – किन्हवली – सरळगाव उजवीकडे वळून – मुरबाड – कर्जत – चौक फाटा/चौकगाव येथून पुर्ण वेळ **(दिवस/रात्रौ)** इच्छित स्थळी जातील.

ब) रात्रौ २३.०० ते सकाळी ०५.०० वा. फक्त या वेळे मध्येच भिवंडी वरून मानकोली नाका डावीकडे वळुन – मुंबई नाशिक हायवे – रांजनोली नाका – यवई नाका उजवीकडे वळुन – पाईप लाईन – सावद चौक उजवीकडे वळुन – गांधारी ब्रिज – आधारवाडी – दुर्गाडी सर्कल – पत्रीपुल – बदलापुर चौक/काटई चौक डावीकडे वळुन – खोणी सर्कल उजवीकडे वळुन – ऊसाटणे – तळोजा एम.आय.डी. सी. – नावडा फाटा डावीकडे वळुन – कळंबोली सर्कल या दुसऱ्या पर्यायी रस्त्यावरून इच्छित स्थळी जातील.

६) सदरची वाहतुक अधिसचुना ही दि.२४/०४/२०१८ पासून मुंब्रा कौसा बाहयवळण रस्ता येथील पारसिक पुलाची दुरूस्तीचे काम पुर्ण होई पावेतो अंमलात राहिल.

७) सदरची वाहतूक अधिसुचना ही मुंब्रा कौसा बाहयवळण रस्ता दुरूस्तीवरील माल ने आण करणाऱ्या वाहनांना लागु राहणार नाही .

८) तसेच अग्नीशमन दल, पोलीस, रूग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील वाहने ही मुंब्रा बायपास ऐवजी जुना पुणे–मुंबई रोड राष्ट्रीय महामार्ग – ४ चा वापर करतील.

९) **कल्याणफाटा व मुंब्रा रेतीबंदर येथून दुचाकी, तिनचाकी, चार चाकी व इतर हलकी वाहने मुंब्रा शहरातून जुन्या पुणे मुंबई रोडने ये–जा करतील. तसेच मुंब्रा शहरामध्ये जीवनावश्यक माल वाहतुक करणाऱ्या वाहनांना रात्रौ १२.०० वा. ते पहाटे ०५.०० वा.पर्यंत प्रवेश देण्यात येत आहे.**

१०) सदरच्या अधिसुचनेचा भंग करणाऱ्या मोटर वाहन चालका विरूध्द **मोटर वाहन कायदा १९८८ कलम १७९ (१)** अन्वये कारवाई करण्यात येईल.

११) या पुर्वीची OW/DCP TRAFFIC THN/ADM/NOTIFICATION/48/2017, DATE.29092017 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना रद्द करण्यात येत आहे.

( परम बीर सिंह )
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

प्रति,

संचालक, शासकिय मुद्रण व लेखण सामुग्री चर्नी रोड मुंबई.

२/— आपणांस विनंती करण्यात येते की, सदरची वाहतूक नियत्रण अधिसुचना ही राजपत्रात प्रसिध्द करावी.

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे

३/— सदरची अधिसुचना प्रसिध्दीस देणेची विनंती आहे.

प्रत — माहिती व कार्यवाहीसाठी.....

जिल्हाधिकारी ठाणे — शहापुर, चिंचोटी, येवई व वर्सोवा मार्गे जड अजवड वाहनांची वाहतुक वळविणेकामी आपले स्तरावर वाहतुक नियंत्रण अधिसुचना निर्गमित करावी.

जिल्हाधिकारी पालघर— दापचरी चेक पोस्ट, तलासरी, अच्छाड चेकपोस्ट, टेननाका, या ठिकाणी दिलेल्या वेळेत जड—अवजड वाहने थांबवून नियंत्रीत पध्दतीने सोडणेकरीता आपले स्तरावर वाहतुक नियंत्रण अधिसुचना निर्गमित करावी.

जिल्हाधिकारी — रायगड.

अपर पोलीस महासंचालक, (का.व सु.) म.रा.मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, वाहतूक म.रा.मुंबई.

पोलीस आयुक्त, नवी मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र नवीमुंबई.

पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर.

पोलीस सह आयुक्त, (वाहतूक) बृहन्मुंबई

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे.

पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर, रायगड (Diversion दरम्यान वाहतुक नियमनाकरीता योग्य उपाययोजना कराव्यात.)

पोलीस अधिक्षक,रस्ता सुरक्षा महामार्ग,ठाणे, मुख्यालय(Diversion दरम्यान वाहतुक नियमनाकरीता योग्य उपाययोजना कराव्यात.)

पोलीस उपायुक्त, वाहतुक नवी मुंबई

मुख्यव्यवस्थापक (वाहतुक) जे.एन.पी.टी.न्हावाशेवा,नवीमुंबई

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल व ठाणे

आयुक्त,ठाणे भिवंडी—निजामपुर शहर, कल्याण—डोंबिवली, उल्हास नगर महानगरपालिका

मुख्याधिकारी, अंबरनाथ, कुळगांव—बदलापुर नगरपरिषद

स्विय सहाय्यक, मा.पालकमंत्री, जिल्हा ठाणे.

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सर्व संबंधीत वाहतुक संघटना.

# पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर

कळवा खाडी पुलाजवळ,
ठाणे (प.) –४०० ६०१
दुरध्वनी क्र.२५३४४४९९
ई–मेल: cp.thane@mahapolice.gov.in

---

OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/Mumbra Bypass Repair/ /2018, DATE- /05/2018

संदर्भ :– १) मुंब्रा कौसा बाहयवळण रस्ता प्रामा – ४ कि.मी. १३३/८०० ते १३९/८१० रस्त्यावरील वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत.

## ''वाहतूक नियंत्रण अधिसुचना (शुध्दीपत्रक)''

दिनांक ०२/०५/२०१८ रोजी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये अपर पोलीस अधिक्षक, तथा प्रभारी पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण व अधिक्षक अभियंता, ठाणे (सा.बां.) मंडळ, ठाणे यांनी दिनांक १८/०४/२०१८ रोजी मा.पोलीस आयुक्त, ठाणे यांनी निर्गमित केलेल्या अधिसुचनेमधील क्रमांक ५.१(अ) मध्ये नमुद केलेला मार्ग जड–अवजड वाहनांना दुतर्फा वाहतुकीसाठी योग्य नसल्याचे सांगितलेले आहे. तसेच सदर मार्गावरील ब्रिजची क्षमता ४० टना पर्यंत आहे. त्यास अनुसरून दि.१८/०४/२०१८ रोजी संदर्भीय OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/Mumbra Bypass Repair/2003/2018, DATE-18/04/2018 अन्वये निर्गमित केलेल्या अधिसुचनेमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

५) मी, मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. – ११६/सी. आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार दिनांक १८/०४/२०१८ रोजी निर्गमित केलेल्या वाहतुक नियत्रंण अधिसुचनेमध्ये खालील प्रमाणे बदल करतो की :–

नाशिकहुन जे.एन.पी.टी. नवीमुंबईकडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना शहापुर राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरून डावीकडे वळून – किनवली मार्गे – सरळगाव – मुरबाड – कर्जत – चौक फाटा – पळस्पे फाटा – डि पॉईट – जे.एन.पी.टी. नवीमुंबईच्या दिशेने जाण्यासाठी २४ तास (दिवस व रात्रौ) एक दिशा मार्ग करण्यात येत आहे.

जे.एन.पी.टी. वरून नाशिक दिशेने जाणाऱ्या वाहनांना जे.एन.पी.टी. – डी. पॉईट – पळस्पे फाटा – डावीकडे वळण घेवून – जुने मुंबई–पुणे रोडने कोनब्रिज उतरल्यानंतर डावीकडे वळण घेवून मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गने – खालापुर टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

जे.एन.पी.टी. वरून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना रात्रौ २३.०० वा. ते पहाटे ०५.०० वा. चे दरम्यान उरण फाटा मार्गे महापे सर्कल येथे येवून डावीकडे वळण घेवून हॉटेल पोर्टिका सरोवर समोरून – उजवे वळण घेवून – रबाळे एम.आय.डी.सी.मार्गे – रबाळे नाका – ऐरोली – पटणी सर्कल – डावीकडे वळण घेवून – ऐरोली सर्कल (रबाळे ट्राफिक चौकी समोरून) – उजवीकडे वळण घेवून मुलूंड ऐरोली ब्रिजवरून ऐरोली टोलनाका मार्गे उजवीकडे वळण घेवून – पुर्व द्रुतगती महामार्ग – आनंदनगर टोलनाक्यावरून मुंबई नाशिक हायवेने नाशिकच्या दिशेने इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना व यापुर्वीची वाहतुक नियंत्रण अधिसुचना दि.०७/०५/२०१८ पासून मुंब्रा कौसा बाहयवळण रस्ता येथील पारसिक पुलाची दुरूस्तीचे काम पुर्ण होई पावेतो अंमलात राहील.

**( मधुकर पाण्डेय )**
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

प्रति,

संचालक, शासकिय मुद्रण व लेखण सामुग्री चर्नी रोड मुंबई.

२/— आपणांस विनंती करण्यात येते की, सदरची वाहतूक नियत्रण अधिसुचना ही राजपत्रात प्रसिध्द करावी.

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे

३/— सदरची अधिसुचना प्रसिध्दीस देणेची विनंती आहे.

<u>प्रत — माहिती व कार्यवाहीसाठी.....</u>

जिल्हाधिकारी ठाणे — शहापुर, चिंचोटी, येवई व वर्सोवा मार्गे जड अजवड वाहनांची वाहतुक वळविणेकामी आपले स्तरावर वाहतुक नियंत्रण अधिसुचना निर्गमित करावी.

जिल्हाधिकारी पालघर— दापचरी चेक पोस्ट, तलासरी, अच्छाड चेकपोस्ट, टेननाका, या ठिकाणी दिलेल्या वेळेत जड—अवजड वाहने थांबवून नियंत्रीत पध्दतीने सोडणेकरीता आपले स्तरावर वाहतुक नियंत्रण अधिसुचना निर्गमित करावी.

जिल्हाधिकारी — रायगड.

अपर पोलीस महासंचालक, (का.व सु.) म.रा.मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, वाहतूक म.रा.मुंबई.

पोलीस आयुक्त, नवी मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र नवीमुंबई.

पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर.

पोलीस सह आयुक्त, (वाहतूक) बृहन्मुंबई

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे.

पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर, रायगड (Diversion दरम्यान वाहतुक नियमनाकरीता योग्य उपाययोजना कराव्यात.)

पोलीस अधिक्षक,रस्ता सुरक्षा महामार्ग,ठाणे, मुख्यालय(Diversion दरम्यान वाहतुक नियमनाकरीता योग्य उपाययोजना कराव्यात.)

पोलीस उपायुक्त, वाहतुक नवी मुंबई

मुख्यव्यवस्थापक (वाहतुक) जे.एन.पी.टी.न्हावाशेवा,नवीमुंबई

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल व ठाणे

आयुक्त,ठाणे भिवंडी—निजामपुर शहर, कल्याण—डोंबिवली, उल्हास नगर महानगरपालिका

मुख्याधिकारी, अंबरनाथ, कुळगांव—बदलापुर नगरपरिषद

स्विय सहाय्यक, मा.पालकमंत्री, जिल्हा ठाणे.

प्रत :— <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सर्व संबंधीत वाहतुक संघटना.